# पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

**पर्यटन उपविभागाची नागरिकांची सनद प्रसिध्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: टिडीएस २०२६/०१/प्र.क्र.१७/पर्यटन-१**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक: २८ फेब्रुवारी, २०२६**

**संदर्भ :** शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.आस्था-२०१७/प्र.क्र.२२/आस्थापना, दि.०८ जून, २०२१.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) व (२) मधील तरतूदीनुसार प्रत्येक विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुखांनी नागरिकांची सनद प्रसिध्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार दि.०८ जून, २०२१ रोजी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची एकत्रित नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य भारतातील सर्वाधिक वैविध्यपूर्ण व पर्यटनासाठी आकर्षक राज्यापैकी असल्याने राज्याची समृध्द संस्कृती, नैसर्गिक सौदर्य, ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक महत्त्व, विविध धार्मिक स्थळे व आधुनिक काळातील पर्यटनाच्या संधीमुळे देश-विदेशातील पर्यटक राज्यात आकर्षित करण्यासाठी विभागामार्फत स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद करुन विविध धोरणांची अंमलबजावणी करण्यात येते. त्यानुषंगाने पर्यटन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता, गतीमानता व जनतेप्रती अधिक उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या अनुषंगाने पर्यटन विभागाची स्वतंत्र नागरिकांची सनद प्रसिध्द करणे आवश्यक होते.

**शासन निर्णय :-**

पर्यटन विभागामार्फत राबविण्यात येणारी विविध धोरणे व योजनांमध्ये पारदर्शकता, गतीमानता व जनतेप्रती अधिक उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या अनुषंगाने, पर्यटन विभागाची स्वतंत्र नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२८१६०५२३६५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH V ROKADE

Digitally signed by SANTOSH V ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=CA5751FFEDBB005FDFF34AB6AC1F8319D061483D7D35E20F744E251360F7920A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH V ROKADE
Date: 2026.02.28 16:59:38 +05'30'

**(संतोष जया विठ्ठल रोकडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.

४. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.

६. मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

८. प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१२. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

१४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

१५. निवडनस्ती (पर्यटन-१)

***

**नागरिकांची सनद**

**पर्यटन विभाग,**

**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**अनुक्रमणिका**


| अ क्र | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ४ |
| २ | विभागाची रचना (परिशिष्ट-१) | ५ |
| ३ | कार्यपूर्तीचे वेळापत्रक | ५ |
| ४ | नियम / शासन निर्णय / परिपत्रके | ५ |
| ५ | (अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण व (ब) जनसामान्यांकडून सूचना | ५ |
| ६.१ | पर्यटन विभागांतर्गत कार्यासनांची विषयसूची (परिशिष्ट-२) | ६-७ |
| ६.२ | (विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत देण्यात येणाऱ्या सेवा) (परिशिष्ट-२ अ) | ८-९ |
| ६.३ | या विभागाशी संबंधित कामकाज करण्यासाठी निर्माण केलेली कार्यासने, कार्यासनातील अधिकारी व त्यांचे दुरध्वनी क्रमांक व पत्ता (परिशिष्ट-३) | १० |
| ६.४ | क्षेत्रिय कार्यालये / महामंडळाकडे सोपविण्यात आलेले विषय, नाव व पत्ता (परिशिष्ट-४) | ११ |
| ६.५ | विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांची माहिती (परिशिष्ट-५)<br>(१) पर्यटन संचालनालय व (२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | १२-१३ |


**********

# नागरिकांची सनद

**१. प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (२) मधील तरतूदीनुसार पर्यटन विभागाची स्वतंत्र प्रस्तूत सनद प्रसिध्द करण्यात येत आहे. पर्यटन विभागाशी संबंधित असणाऱ्या सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक नागरिकांना उपलब्ध करण्यासाठी पर्यटन विभाग बांधिल आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य या दोन विभागांचे एकत्रिकरण करून एका स्वतंत्र प्रशासकीय विभागाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. शाकानि-१००६/प्र.क्र.२३/२००६/१८ (र.व.का.) दि.३१/०५/२००६ नुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग असा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला.

पर्यटन विभाग हा राज्यातील पर्यटन क्षेत्राच्या नियोजन, विकास, प्रोत्साहन, नियमन व सुलभीकरणासाठी जबाबदार असलेला एक महत्त्वाचा प्रशासकीय विभाग आहे. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ अन्वये राज्यातील पर्यटन स्थळांचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधणे, पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणे, स्थानिक अर्थव्यवस्था बळकट करणे तसेच ग्रामीण, आदिवासी व मागास भागांचा समावेशक विकास घडवून आणणे हे विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

राज्यातील नैसर्गिक सौंदर्य, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे, साहसी पर्यटन, कृषी पर्यटन, किनारी व पर्यावरणपूरक पर्यटन यांचा समतोल विकास साधून महाराष्ट्राला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न पर्यटन विभागामार्फत करण्यात येत आहे. त्याचबरोबर पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणुकीस चालना देणे, उद्योजकांना प्रोत्साहन देणे तसेच पर्यटनाशी संबंधित विविध सेवा व सुविधा सुलभ करणे हेही विभागाचे महत्त्वाचे कार्य आहे.

नागरिकांना, पर्यटन उद्योजकांना व संबंधित घटकांना पारदर्शक, सुलभ, नियोजनबद्ध व उत्तरदायी सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही नागरिकांची सनद तयार करण्यात येत आहे. या सनदेमध्ये पर्यटन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा, त्या सेवांसाठीची अपेक्षित कालमर्यादा, विभागाच्या जबाबदाऱ्या तसेच तक्रार निवारण यंत्रणा यांची स्पष्ट माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे, जेणेकरून सेवा पुरवठ्यात पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण होईल.

पर्यटन विभागाशी संबंधित सेवांचा लाभ घेताना नागरिकांना कोणत्या बाबींची अपेक्षा ठेवता येईल व विभागाकडून कोणत्या प्रकारची सेवा दिली जाईल याबाबत स्पष्टता निर्माण करणे हा या नागरिकांच्या सनदेचा मुख्य उद्देश आहे. ही नागरिकांची सनद सुधारित होईपर्यंत लागू राहील व अवश्यकतेनुसार वेळोवेळी आढावा घेऊन आवश्यक ते बदल करण्यात येतील.

## २. पर्यटन विभागाची रचना (परिशिष्ट-१)

<table>
<tr><td colspan="4">मा.मंत्री (पर्यटन विभाग)</td></tr>
<tr><td colspan="4">मा.राज्यमंत्री (पर्यटन विभाग)</td></tr>
<tr><td colspan="4">प्रधान सचिव (पर्यटन विभाग)</td></tr>
<tr><td colspan="2">उप सचिव</td><td colspan="2">उप सचिव</td></tr>
<tr><td colspan="2">अवर सचिव</td><td colspan="2">अवर सचिव</td></tr>
<tr><td>कक्ष अधिकारी</td><td>कक्ष अधिकारी</td><td>कक्ष अधिकारी</td><td>कक्ष अधिकारी</td></tr>
</table>

## ३. कार्यपूर्तीचे वेळापत्रक:-

पर्यटन विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक **"परिशिष्ट-२"** येथे जोडले आहे. पर्यटन विभागाकडून (खुद्द) नागरिकांना थेट सेवा पुरविण्यात येत नाहीत. तथापि, पर्यटन विभागाच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयाकडून नागरिकांसाठी / संस्था / उद्योगाकरीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा "**परिशिष्ट-२ अ"** येथे जोडले आहे. पर्यटन विभाग (खुद्द) साठी निर्माण केलेली कार्यासने, कार्यरत अधिकाऱ्यांचा दुरध्वनी क्रमांक व आसन व्यवस्था इत्यादीची माहिती **"परिशिष्ट-३"** येथे जोडली आहे. क्षेत्रिय कार्यालये / महामंडळाचे विषय, नाव व पत्ता याबाबतची माहिती **"परिशिष्ट-४"** येथे जोडली आहे. क्षेत्रिय कार्यालये / महामंडळांकडून करण्यात येणाऱ्या कामकाजाची माहिती **"परिशिष्ट-५"** येथे जोडली आहे.

## ४. नियम / शासन निर्णय / परिपत्रके:-

या विभागाशी संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रक या पुस्तिकेत उपलब्ध आहे.

## ५. (अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण:-

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्याबाबत संबंधित कार्यासनाच्या सह / उप सचिव यांच्याकडे तक्रार नोंदविता येईल. सदर तक्रारांची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास नागरिकांना आपली तक्रार या विभागाच्या प्रधान सचिव / सचिव यांच्याकडे करता येईल.

### (ब) जनसामान्यांकडून सूचना :-

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येऊन आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

***

## ६.१ पर्यटन विभागांतर्गत कार्यासनांची विषयसूची (परिशिष्ट-२)

| कार्यासन क्रमांक | विषय | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी (दालन क्रमांक व दुरध्वणी क्रमांक) | सेवा विहित कालावधी पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल असा अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| **पर्यटन-१** | १. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंची (RTDS) अंमलबजावणी, निधीची तरतूद, विनियोग व पर्यटन विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, पर्यटन स्थळांवरील साधनसामुग्रीचा विकास करणे.<br>२. उपरोक्त बाबींशी संबंधित समन्वय विषयक सर्व कामकाज.<br>३. पर्यटन उप विभागातील सर्व कार्यासनाशी समन्वय साधून माहितीचे एकत्रीकरण, सादरीकरण करणे, इतर प्रशासकीय विभागांना माहिती उपलब्ध करुन देणे, समन्वय विषयक सर्व कामकाज. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी आणि तातडीच्या स्वरुपात नस्ती शक्यतो ४ दिवसांत निकाली काढण्यात येते. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाशी संबंधित बाब अंतर्भूत असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येते. (धोरणात्मक प्रकरणांचा यामध्ये समावेश नाही.) | कक्ष अधिकारी (पर्यटन-१), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.४२५ (विस्तार), चौथा मजला, मंत्रालय, मुंबई | उप सचिव (पर्यटन-१), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.४२५ (विस्तार), चौथा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दुरध्वनी क्र.०२२२२०२२७०२ |
| **पर्यटन-२** | १. पर्यटन विकासाचे मोठे आराखडे / विशेष प्रकल्प.<br>२. अन्य विभागाकडून पर्यटनाशी संबधित प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींशी संबंधित अनौपचारिक संदर्भावर कार्यवाही करणे.<br>३. उपरोक्त बाबींशी संबंधित समन्वय विषयक सर्व कामकाज. | वरीलप्रमाणे | कक्ष अधिकारी (पर्यटन-२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.३०३ अ (मुख्य इमारत), तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई | उप सचिव (पर्यटन-२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.३०३ अ (मुख्य इमारत), तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दुरध्वनी क्र. ०२२ २२०२ ५६०८ |
| **पर्यटन-३** | १. केंद्रीय अर्थसहाय्यातून राज्यातील पर्यटन स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबत (प्रसाद, स्वदेश दर्शन- १ व २) योजनांशी संबधित | वरीलप्रमाणे | कक्ष अधिकारी (पर्यटन-३), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.४२५ | उप सचिव (पर्यटन-१), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.४२५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यवाही.<br>२. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील युवकांना पर्यटन व आदरातिथ्य क्षेत्रातील प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्यासाठी प्रशिक्षण व क्षमता बांधणी योजना.<br>३. राज्याच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने प्रसिध्दीकरीता देश विदेशातील विविध प्रदर्शने, मेळे आणि उत्सव यामधून महाराष्ट्रातील पर्यटनविषयक बाबीचे दर्शन घडविणे, थंड हवेच्या ठिकाणांचा व सुट्टी शिबीरांचा विकास.<br>४. उपरोक्त बाबींशी संबंधित समन्वय विषयक सर्व कामकाज. | | (विस्तार), चौथा मजला, मंत्रालय, मुंबई | (विस्तार), चौथा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दुरध्वनी क्र. ०२२ २२०२ २७०२ |
| **पर्यटन-४** | १. पर्यटन धोरण ठरविणे, पर्यटन धोरण-१९९९, २००६, २०16 व २०२४ अंमलबजावणी करणे. त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व बाबी उदा. साहसी पर्यटन, कृषी पर्यटन, कॅराव्हॅन पर्यटन, "आई" केंद्रीत महिला पर्यटन धोरण इ.<br>२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व पर्यटन संचालनालयाशी संबंधित प्रादेशिक पर्यटन विकास योजनेविषयक (RTDS) वगळून सर्व प्रकरणे.<br>३. Institute of Hotel Management, दादर, Institute of Hotel Management, सोलापूर आस्थापना आणि सेवाविषयक बाबी.<br>४. उपरोक्त बाबींशी संबंधित समन्वय विषयक सर्व कामकाज. | वरीलप्रमाणे | कक्ष अधिकारी (पर्यटन-४), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र.३०३ अ (मुख्य इमारत), तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई | उप सचिव (पर्यटन-२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.<br>दालन क्र. ३०३ अ (मुख्य इमारत), तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दुरध्वनी क्र. ०२२ २२०२ ५६०८ |

## ६.२ विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत देण्यात येणाऱ्या सेवा (परिशिष्ट-२ अ)

| S. N | Service Name | Standard/ Gateway | Govt. to Business (G2B) / Govt. to Citizen (G2C) | Can application be made directly on the department portal? | Nodal Officer/ Service Officer | Nodal Officer Contact Number | Nodal Officer Email |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Issuance of temporary registration certificate to tourist entities. | Gateway services | G2B | YES | Joint Director, DOT | 02269107602 | jointdirector@maharashtratourism.gov.in |
| 2 | Issuance of eligibility certificate to tourist entities | Gateway services | G2B | YES | Joint Director, DOT | 02269107602 | jointdirector@maharashtratourism.gov.in |
| 3 | Issuance of non-objection certificate for stamp duty concession to tourist | Gateway services | G2B | YES | Joint Director, DOT | 02269107602 | jointdirector@maharashtratourism.gov.in |
| 4 | Granting industrial status to the hospitality sector | Gateway services | G2B | YES | Joint Director, DOT | 02269107602 | jointdirector@maharashtratourism.gov.in |
| 5 | registration under the agricultural tourism policy | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | ** | ** |
| 6 | Registration under the adventure tourism policy | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | | |
| 7 | Registration under the Caravan tourism | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | | |
| 8 | Registration under then women centered tourism policy (Mahila kendrit tourism policy) | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | * | * |
| 9 | Registration of tourism villas | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | | |
| 10 | Registration of tourism apartments | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | | |
| 11 | Registration of homestay | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | | |
| 12 | Registration of vacation homes | Gateway services | G2B | YES | Concerned Dy. director, DOT | | |
| 13 | Registration and renewal under the bed & breakfast scheme | Standard | G2C | NO | Concerned Regional Manager, MTDC | | |
| 14 | Registration & renewal under the Mahabrahman scheme | Standard | G2C | NO | Concerned Regional Manager, MTDC | | |

** अ.क्र. ५ ते १४ सेवा उपलब्ध करुन देणेकरीता क्षेत्रिय नोडल अधिकारी, संपर्क क्र आणि इमेल आईडी खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Region | Contact No | | Mail ID | |
|---|---|---|---|---|---|
| | | DOT | MTDC | DOT | MTDC |
| 1 | Kokan | 022-20876413 | 2241580932 | ddtourism.kokan-mh@gov.in | romumbai@maharashtratourism.gov.in |
| 2 | Pune | 020-29900289 | 020-26128169 | ddtourism.pune-mh@gov.in | ropune@maharashtratourism.gov.in |
| 3 | Nashik | 0253-29945464 | 0253-2970049 | ddtourism.ng-mh@gov.in | ronagpur@maharashtratourism.gov.in |
| 4 | Ch. Sambhaji Nagar | 0240-2990457 | 0240-2331198 | ddtourism.awb-mh@gov.in | roch.sambhajinagar@maharashtratourism.gov.in |
| 5 | Amravati | 0271-2661611 | 072126616121 1/12 | ddtourism.ami-mh@gov.in | roamravati@maharashtratourism.gov.in |
| 6 | Nagpur | 0712-2533327 | 7122533325 | ddtourism.nashik-mh@gov.in | ronashik@maharashtratourism.gov.in |

*महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला केंद्रीत पर्यटन धोरण (AAI) योजना:-

| Scheme Name | Nodal Officer/Scheme Officer | | Tech POC | | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| | Name | Contact Number | Name | Contact Number | |
| AAI (Gender inclusive tourism policy) | Joint Director | 022 69107602 | Smt. Sonam Pawar | 0253 2995464 | This scheme is not on MahaDBT but it operates through the department's individual portal where people can apply for the scheme. It also has an admin access wherein we can oversee and access all the data. https://aai-portal.maharashtratourism.gov.in/ |

***

**६.३ या विभागाशी संबंधित कामकाज करण्यासाठी निर्माण केलेली कार्यासने, कार्यासनातील अधिकारी व त्यांचे दुरध्वनी क्रमांक व पत्ता खालीलप्रमाणे आहे:- (परिशिष्ट-३)**

| कार्यासनाचे नाव | कार्यासन अधिकारी | अवर सचिव तथा पर्यवेक्षीय अधिकारी | उप सचिव तथा नियंत्रक अधिकारी | दालन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| **पर्यटन-१** | श्री.प्रशांत नलवडे, कक्ष अधिकारी (पर्यटन-१) | श्रीम.स्मिता राणे, अवर सचिव (पर्यटन-१), | श्री.संतोष रोकडे, उप सचिव (पर्यटन-१), दुरध्वनी क्र. ०२२ २२०२ २७०२ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग. दालन क्र.४२५ (विस्तार), चौथा मजला, मंत्रालय, मुंबई |
| **पर्यटन-३** | श्री.प्रशांत नलवडे, कक्ष अधिकारी, (पर्यटन-३) (अति.कार्य.) | | | |
| **पर्यटन-२** | श्री.संदीप कदम, कक्ष अधिकारी (पर्यटन-२) | श्रीम.अनिता तुम्मुलवार, अवर सचिव (पर्यटन-२) | श्री.विजय पोवार, उप सचिव (पर्यटन-२), दुरध्वनी क्र. ०२२ २२०२ ५६०८ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग. दालन क्र.३०३ अ (मुख्य), तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई |
| **पर्यटन-४** | डॉ.न.आ. कदम, कक्ष अधिकारी (पर्यटन-४) | | | |

***

**६.४ क्षेत्रिय कार्यालये / महामंडळाकडे सोपविण्यात आलेले विषय, नाव व पत्ता (परिशिष्ट ४)**

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव व पत्ता | विषय |
|---|---|---|
| १ | पर्यटन संचालनालय (DoT), मुंबई<br>पर्यटन संचालनालय कार्यालय, चौथा मजला, साखर भवन, रामनाथ गोएंका मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१<br>दुरध्वनी क्र. ०२२-६९१०७६००<br>ई-मेल- diot@maharashtratourism.gov.in | शासनाच्या पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी आणि अंमलबजावणी करणे.<br>(परिशिष्ट क्र. ५ नुसार) |
| २ | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC), मुंबई<br>महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यालय, पहिला मजला, मफतलाल हाऊस, एच.टी.पारेख मार्ग, १६९, बॅकबे रिक्लमेशन, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०<br>दुरध्वनी क्र. ०२२-४१५८०९२२<br>ई-मेल- md@maharashtratourism.gov.in | महाराष्ट्र पर्यटन विकासास चालना देण्याच्या दृष्टीने राज्यातील अभयारण्ये, उपवने इ. पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षक स्थळे, भाडेपट्टयाने घेऊन वा अन्य प्रकारे संपादन करुन त्याचा विकास करणे.<br>(परिशिष्ट क्र. ५ नुसार) |

***

## ६.५ विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांची माहिती (परिशिष्ट ५)

पर्यटन विभागाच्या अखत्यारित पर्यटन संचालनालय व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही दोन क्षेत्रिय कार्यरत असून दोन्ही कार्यालयांमध्ये कामकाजाचे वाटप पर्यटन विभाग, शासन परिपत्रक, **दि.०२ एप्रिल, २०१९** अन्वये करण्यात आले आहे.

### १. पर्यटन संचालनालय, मुंबई :-

राज्याच्या पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी पर्यटन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली शा.नि.क्र.टीडीसी-२०१४/२/प्र.क्र.९६/पर्यटन, **दि.१२ एप्रिल, २०१६** अन्वये पर्यटन संचालनालयाची निर्मिती करण्यात आली असून एप्रिल, २०१९ पासून पर्यटन संचालनालय प्रत्यक्ष कार्यरत झाले आहे. पर्यटन संचालनालयाकरीता एकूण ५५ पदे प्रथम टप्प्यात निर्माण करण्यात आली आहेत. पर्यटन संचालनालयामार्फत पर्यटन धोरण २००६ व २०१६ नुसार पर्यटन घटकांना प्रोत्साहने व सवलती देणे, कृषि पर्यटन धोरण, साहसी पर्यटन धोरण, कॅरव्हान पर्यटन धोरण, बीच शॅक धोरण, कृषि पर्यटन धोरण, आई-महिला केंद्रित पर्यटन धोरण, इ. धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुषंगाने, विविध पर्यटन स्थळांचे पर्यटन विकास आराखडे तयार करणे, पर्यटन धोरण २०२४ मधील अन्य पर्यटन प्रकारांबाबत नियमावली, धोरण प्रस्तावित करणे व निर्णयानंतर त्याची अंमलबजावणी करणे, या धोरणांच्या अंमलबजावणी करीता निर्माण करण्यात आलेल्या विविध समित्यांच्या बैठकींच्या आयोजनाची कार्यवाही करणे, पर्यटन स्थळांची प्रसिध्दी, पर्यटकांना राज्यातील पर्यटन स्थळासंबंधी माहिती उपलब्ध करुन देणे, विविध पर्यटन महोत्सव व रोड शो इ.चे आयोजन करणे, केंद्र शासनाच्या अर्थसहाय्यातून अंमलात येणाऱ्या पर्यटन विषयक पायाभूत सुविधा योजनांची अंमलबजावणी इ.ची जबाबदारी पर्यटन संचालनालयाकडे सोपविण्यात आली आहेत.

२. पर्यटन संचालनालयाकडे सोपविण्यात आलेले विषय :-

१) शासन निर्णय, **दि.१८/०७/२०२४** अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या पर्यटन धोरण-२०२४ नुसार पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी आणि अंमलबजावणी करणे व शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

२) पर्यटन धोरणांनुसार राज्याच्या पर्यटन वृध्दीसाठी पर्यटन घटकांना प्रोत्साहन देणे व त्यानुषंगिक पर्यटन प्रकल्पांना मंजुरी देणे, विहीत प्रमाणपत्र देणे यासारख्या बाबींबाबत कार्यवाही करणे.

३) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत तसेच केंद्रीय अर्थसहाय्यातून राज्यातील पर्यटन स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास करणे. पायाभूत सुविधा निर्मित प्रकल्पांची आखणी करणे, विशेष प्रकल्प राबविणे. याकरिता निधीची तरतूद व विनियोग याबाबत संनियंत्रण ठेवणे. तसेच याबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करणे.

४) राज्यातील पर्यटन स्थळांना प्रसिध्दी देणे. राज्याच्या पर्यटनाच्या वृध्दीसाठी प्रसिध्दी व प्रचालनासाठी राज्यातील, देशातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनाबाबतचे

कार्यक्रम, प्रदर्शने, परिषदा, संवाद, महोत्सव यामध्ये सहभागी होणे व त्याकरिता नियोजन करणे.

५) पर्यटकांना पर्यटनासंबंधी माहिती उपलब्ध करुन देणे. याकरिता नियोजन करुन त्यानुसार प्रचार व प्रसिध्दी करणे.

६) पर्यटकांच्या सुरक्षिततेविषयी उपाययोजनांची अंमलबजावणी करणे.

७) पर्यटन संचालनालयातील संचालक, पर्यटन संचालनालय यांच्या अखत्यारितील पदांबाबत विहीत सेवाप्रवेश नियम व प्रचलित शासन निर्णय / अधिसूचना / परिपत्रके / आदेश व कार्यपध्दतीनुसार पर्यटन संचालनालयातील पदभरती, नियुक्त्या, पदोन्नती, शिस्तभंग विषयक कारवाई तसेच इतर आस्थापना आणि सेवाविषयक बाबी हाताळणे.

८) न्यायालयीन व कायदेविषयक बाबी हाताळणे.

९) पर्यटन विषयक विधीमंडळ कामकाजाविषयी कार्यवाही करणे, माहिती संकलित करणे व शासनास सादर करणे.

१०) शासन वेळोवेळी निदेशित करेल व विहीत करेल अशी कामे.

## २. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई

पर्यटनाचा विकास जलदगतीने करण्यासाठी **दि.२० जानेवारी, १९७५** रोजी "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची" स्थापना कंपनी ॲक्ट १९५६ अंतर्गत करण्यात आली. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून नागरिकांसाठी विविध प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे खालील विषय सोपविण्यात आलेले आहे :-

१) राज्यातील पर्यटन केंद्रे, पर्यटक निवास व इतर पर्यटन प्रकल्प उभारणे.
२) पर्यटक निवासाचे व्यवस्थापन करणे.
३) महामंडळांतर्गत निवास व न्याहरी योजनेची अंमलबजावणी करणे.
४) राज्यामध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या देशी व विदेशी पर्यटकांसाठी माहिती उपलब्ध करुन देणे, मार्गदर्शन करणे व त्याबाबतची सांख्यिकीय माहिती अद्ययावत करणे.
५) वित्तीय व्यवस्थापन व आर्थिक नियोजन करणे, तसेच याबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करणे.
६) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातील आस्थापना आणि सेवाविषयक बाबी हाताळणे.
७) पर्यटन विषयक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाशी संबंधित बाबींबाबत विधीमंडळ कामकाजाविषयी कार्यवाही करुन, त्याबाबतचा अहवाल / माहिती शासनास सादर करणे.
८) महामंडळाच्या कामकाजाशी संबंधित न्यायालयीन व कायदेविषयक बाबी हाताळणे.
९) शासन व पर्यटन संचालनालय वेळोवेळी निदेशित करेल व विहीत करेल अशी कामे.

***